# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 31/07/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि. मीं. मौजा बायपास चौक येथे दिनांक 30/07/2020 चे 06.30 वा. ते 07.00 वा. दरम्यान उमरेड पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 40/ ईएल – 1337 क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे क्र. 1) विक्की विजय धनविजय, वय 40 वर्ष, रा. गिट्टीखदान, नागपुर व 2) महेश कैलाश वर्जे, वय 23 वर्ष, रा. मोतीबाग, नागपूर यांच्या ताब्यातुन 10 जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 8,10,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार रमेशचंद्र त्रिपाठी, पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(ड)(घ)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),(ए)(1) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम 184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार किशोर ठाकुर 7020901419 हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 1 कि. मी अंतरावर राजाजी वार्ड रामटेक येथे दिनांक 30/07/2020 चे 18:10 वा. ते 18.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रितेश उपेद्रनाथ शर्मा, वय वय 47 वर्ष, रा. राजाजी वार्ड रामटेक हे पत्नी मुलासह आपले घराचे छतावर उभे असतांना आरोपी नामे– सतीश अवधेश तिवारी, रा. गांधी वार्ड रामटेक हा बाजुच्या बिल्डींगवर उभा राहुन कटलेल्या पतंगीचा मांजा लुटत होता. दरम्यान फिर्यादीच्या बिल्डींगवर पतंगीचा मांजा आल्याने फिर्यादीच्या मुलाने पकडला तेव्हा आरोपीने त्यांना शिवीगाळ करून मांजा सोडा असे म्हटले व बिल्डींग वरून खाली आला तेव्हा आरोपीसद्धा खाली आला तेव्हा फिर्यादीस शिवीगाळ करून गोटे मारू लागला असता फिर्यादीने गोटे हुकवले तेवढयात फिर्यादीची पत्नी मधु शर्मा फिर्यादी समोर आली असता तिचे डाव्या हाताच्या पंजावर गोटा लागुन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मनोहर राऊत पो. स्टे रामटेक 9423628307 हे करीत आहे.

## सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा हिवराबाजार शेत शिवार येथे दिनांक 26/07/2020 चे 09.30 वा. ते 10.00 वा. दरम्यान सौ. मुक्ताबाई सुर्यवंशी उईके, वय 40 वर्ष, रा. फुलझारी या मौजा हिवराबाजार शेत शिवार दिलीप डेकरवार यांच्या शेतात काम करीत होते. दरम्यान अचानक त्यांचे डाव्या पायाचे घोटक्याजवळ सापाने चावा घेतला. त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना प्रथम उपचार हिवराबाजार व नंतर नागपुर मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान 27/07/2020 चे 14.00 वा त्या मरण पावला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलीस नाईक श्री. संजय दाभाडे, मेयो हॉस्पीटल, नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. देवलापार येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस शिपाई सुर्यप्रकाश वावरे 9011922405 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर येनवा येथे दिनांक 30/07/2020 चे 09:00 वा. ते 11.00 वा. दरम्यान कु. राणी विठ्ठल लाडे(मृतक), वय 17 वर्ष, रा. येनवा हिचा मानसिक रोगाचा लता मंगेशकर हॉस्पीटल हिंगणा येथे उपचार सुरू होता. फिर्यादी शेतात गेले असता राणी लाडे हिने घरी ओढणीने गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विठ्ठल काशीरामजी लाडे, वय 45 वर्ष, रा. येनवा यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ चव्हाण हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर